सकाळ



अर्जुनी : ग्रामपंचायतीला 'सायबर शिक्षित गाव' म्हणून प्रमाणपत्र प्रदान करताना डॉ. जॅसमिन. शेजारी मान्यवर.

अर्जुनी ठरले पहिले 'सायबर शिक्षित गाव'

नानीबाई चिखली, ता. ३ : अर्जुनी (ता. कागल) ग्रामपंचायतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, गावाची 'महाराष्ट्रातील पहिले सायबर शिक्षित गाव' म्हणून घोषणा करण्यात आली. क्विक हील फाउंडेशन, पुणे आणि अर्जुननगर येथील देवचंद महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम गावात राबविला होता.

यावेळी अर्जुनी येथे झालेल्या 'सायबर शिक्षित गाव' प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायतीला सायबर शिक्षित गावाचे प्रमाणपत्र प्रदान केले. उपक्रमांतर्गत अर्जुनी गावातील ग्रामस्थांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, संशयास्पद फोन कॉल व संदेश, बनावट कॉल, लिंक, ओटीपी व यूपीआय पिनची सुरक्षितता, सोशल मीडिया अकाउंटची सुरक्षा, ऑनलाइन आर्थिक व्यवहारातील दक्षता आणि सायबर गुन्हा घडल्यास करावयाच्या उपाययोजनांबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. अनुपमा काटकर, गट विकास अधिकारी कुलदीप बोंगे, अजय शिर्के, मुरगूडचे पोलिस उपनिरीक्षक अनिकेत कुडले, देवचंदचे प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश साळुंखे, उपप्राचार्य डॉ. अशोक डोनर, प्रशासक जे. एन. सातवेकर, प्रवीणसिंह सुळकुडे, प्रा. प्रशांत कुंभार आदी उपस्थित होते.